**प्रेस नोट दिनांक २६/०३/२०१९**

**महागड्या कार मधुन येवुन घरफोड्या व चोऱ्या करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना येरवडा पोलीसांनी अटक करून त्यांचे कडुन एकुण १५ गुन्हे उघड करून १८,४५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त.**

येरवडा पोलीस स्टेशन हद्दीतील घरफोड्या व बसमधील चोरी या गुन्ह्यांना प्रतिबंध करून ते उघडकीस आणने करिता येरवडा पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक मंगेश मांगे, पोलीस नाईक अशोक गवळी, नवनाथ मोहिते, मनोज कुदळे असे येरवडा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करित असताना त्यांना त्यांचे गोपनीय बातमीदारा मार्फत मिळालेल्या बातमी वरून इसम नामे १) जयवंत उर्फ जयड्या गोवर्धन गायकवाड वय ३२ वर्षे रा. डिपी रोड औंध पुणे २) नितीन उर्फ हुबळ्या शंकर जाधव वय २५ वर्षे रा. सर्वोदय कॉलनी मुंढवा पुणे यांना अटक करून त्यांचे कडे चौकशी केली असता त्यांनी येरवडा पोलीस स्टेशन च्या हद्दीमध्ये दिवसा व रात्री तसेच बसमध्ये चोऱ्या केल्याचे कबुल केले असुन त्यांना कोणी ओळखु नये या करिता ते सुट बुट घालुन शेओरलेट कंपनीच्या कॅप्टीव्हा या महागड्या कारमधुन येवुन सदरची कार हि कॅमेरा नसलेल्या ठिकाणी आडबाजुस उभी करून त्याद्वारे घरफोड्या करित असत त्यांच्या या गुन्हे करण्याच्या पध्दती मुळे ते पोलीसांना आज पर्यंत गुंगारा देत होते. यापैकी जयवंत उर्फ जयड्या गोवर्धन गायकवाड याचेवर यापुर्वी पुणे शहर व आजुबाजुचे परिसरात चोरी व घरफोडीचे एकुण ८८ गुन्हे दाखल आहेत. तसेच नितीन उर्फ हुबळ्या शंकर जाधव याचेवर पुणे शहरात चोरीचे व दरोड्याचा प्रयत्न अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

वरिल दोन्ही आरोपींकडे अटक मुदतीत तपास करून त्यांचकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गुन्हा रजि. नं. व कलम |
|---|---|---|
| १ | येरवडा पो.स्टे. | ६३/२०१९ भा.द.वि.क. ४५४,४५७,३८० |
| २ | येरवडा पो.स्टे. | ११३/२०१८ भा.द.वि.क. ४५७,३८० |
| ३ | येरवडा पो.स्टे. | ३०१/२०१८ भा.द.वि.क. ४५४,४५७,३८० |
| ४ | येरवडा पो.स्टे. | ३०५/२०१८ भा.द.वि.क. ४५४,४५७,३८० |
| ५ | येरवडा पो.स्टे. | ४४५/२०१८ भा.द.वि.क. ४५४,४५७,३८०,५११ |
| ६ | येरवडा पो.स्टे. | ५४४/२०१८ भा.द.वि.क. ४५७,३८० |
| ७ | येरवडा पो.स्टे. | ७८३/२०१८ भा.द.वि.क. ४५४,४५७,३८० |
| ८ | येरवडा पो.स्टे. | ५०८/२०१८ भा.द.वि.क. ४५४,३८० |
| ९ | येरवडा पो.स्टे. | १९/२०१९ भा.द.वि.क. ४५४,३८० |
| १० | येरवडा पो.स्टे. | २२/२०१९ भा.द.वि.क. ४५४,४५७,३८० |
| ११ | येरवडा पो.स्टे. | ७९/२०१८ भा.द.वि.क. ३८० |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| १२ | येरवडा पो.स्टे. | ४१/२०१८ भा.द.वि.क. ३७९,३४ |
| १३ | येरवडा पो.स्टे. | १२७/२०१८ भा.द.वि.क. ३७९ |
| १४ | येरवडा पो.स्टे. | २४०/२०१८ भा.द.वि.क. ३७९,३४ |
| १५ | येरवडा पो.स्टे. | ६८८/२०१८ भा.द.वि.क. ३७९ |

सदर आरोपींकडुन येरवडा पोलीस स्टेशनचे तपास पथकाने ८४ ग्रॅम सोन्याचे दागिने, २० ग्रॅम चांदी, ९७,०००/- रूपये रोख रक्कम, एक सोनी कंपनीचा एलसीडी टिव्ही व एक चोरीच्या पैशातुन घेतलेली शेओरलेट कॅप्टीव्हा कार असा सर्व मिळुन एकुण १८,४५,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदर आरोपीस मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट नं. ६ पुणे यांनी आरोपींची ७ दिवस पोलीस कस्टडी मंजुर केली आहे.

सदर कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त सो. पुर्व प्रादेशिक विभाग श्री.सुनिल फुलारी, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ४ पुणे श्री. प्रसाद आक्कानवरू सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग डॉ. शिवाजी पवार, राजेंद्र कदम वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा स्टेशन पुणे, अजय वाघमारे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक मंगेश भांगे, पोलीस नाईक अशोक गवळी, नवनाथ मोहिते, मनोज कुदळे, पंकज मुसळे, पो.हवा. हणमंत जाधव, पो.शि. समिर भोरडे,अजय पाडोळे,बहिरट यांनी केलेली आहे.

(राजेंद्र कदम)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन पुणे

Scanned by CamScanner


येरवडा पोलीस स्टेशन